सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष सर्वसाधारण सभेपुढे विषय क्र.अ. ६६ ठ. क्र. १३२ दि. १६/०९/२०१६ रोजी ठेवता आलेला प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

नागरी समुदाय विकास प्रकल्प (UCD) अंतर्गत शिवणवर्ग शिक्षिका मानधनावरील पदास मुदतवाढीबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव सदर शिवणवर्ग शिक्षिकांचे मानधनावरील मुदतवाढ ही दि. ३१-३-२०१६ अखेर संपत असल्याने, प्रस्तावासोबतच्या तक्त्यातील अ.क्र. १ ते १० शिवणवर्ग शिक्षिकांना नागरी समुदाय विकास प्रकल्प संचालक यांचे शिफारशीनुसार दि. १-४-२०१६ व दि. २-४-२०१६ रोजी दोन दिवसाचा तांत्रिक खंड देऊन दि. ३-४-२०१६ ते दि. ३१-३-२०१७ अखेरच्या कालावधीकरिता मुदतवाढ देणेकामी महानगरपालिकेच्या मान्यतेची आवश्यकता असल्याने सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समिती मार्फत मा.म.न.पा.पुढे सादर करणेकामी मा. आयुक्त यांचे दि. १२-५-१६ चे टिपणीने आलेल्या प्रकरणी मान्यता मिळणेस्तव मा. स्थायी समिती ठराव क्र. १०३, दि. ४-६-२०१६ चे शिफारसी प्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

तसेच सोलापूर महानगरपालिकेमध्ये ज्या ज्या पदावर कंत्राटी अथवा मानधनावर सेवकांची नेमणूक देणेत आलेली आहे. त्यांची मुदत संपुष्टात आली असेल तर त्यांना मुदतवाढ देणेत येत असून, त्याप्रमाणे त्यांचे पगार अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/आयुक्तां/... सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. ६७. ठ. क्र. १३३ दि. १६/०९/२०१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



एकवट मानधनावरील वाहन चालक सेवकांच्या पुढील मुदतवाढ बाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव व प्रस्तावात नमूद प्रमाणे जाहिर प्रसिध्दीकरण पाहता व सार्वजनिक आरोग्य अभियंता यांचे दि. १८-४-१६ चे निवेदन पाहता त्यांचे निवेदनात नमूद कारणास्तव प्रस्तावातील तक्त्यात नमूद संबंधित वाहन चालक उमेदवारांची आवश्यकता असल्याने सहा महिन्याच्या कालावधी करिता करण्यांत आलेली नियुक्तीची मुदत दि. १०-५-२०१६ रोजी संपुष्टात येत असल्याने दि. ११-५-२०१६ व दि. १२-५-२०१६ असे दोन दिवसाचा तांत्रिक खंड देऊन दि. १३-५-२०१६ पासून पुढे एक वर्षाच्या कालावधीकरिता मुदतवाढ देणेकामी सदरचा प्रस्तावास मा. स्थायी समिती मार्फत मा.म.न.पा.ची मान्यता आवश्यक असल्याने मा.म.न.पा.पुढे सादर करणेकामी मा. आयुक्त यांचे दि. १२-५-१६ चे टिपणीने आलेल्या प्रकरणी मान्यता मिळणेस्तव मा. स्थायी समिती ठराव क्र. १०४, दि. ४-६-२०१६ चे शिफारसी प्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

तसेच सोलापूर महानगरपालिकेमध्ये ज्या ज्या पदावर कंत्राटी अथवा मानधनावर सेवकांची नेमणूक देणेत आलेली आहे. त्यांची मुदत संपुष्टात आली असेल तर त्यांना मुदतवाढ देणेत येत असून, त्याप्रमाणे त्यांचे पगार अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. ज ६८ ठ. क्र. १३८
दि. १६/०९/२०१६ रोजी ठेवला खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला



उजनी धरणातील पातळी खालावत असल्याने जलाशयात फ्लोटींग पंपाद्वारे तिबार पंपींग करणे कामाचे पूर्वगणनपत्रक क्र. ०१/२०१६-१७ र.रु. २,५६,२५,७१०/- यांस मा. स्थापत्य समितीची शिफारस होवून मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेस तसेच सदरचे कामास अंदाजपत्रकीय तरतूद उपलब्ध नसलेने सदर कामासाठी र.रु. २,५६,२५,७१०/- इतके अंदाजपत्रकीय तरतूद उपलब्ध होणेस्तव मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेकामी मा. आयुक्त यांचे दि. ७-५-२०१६ चे टिपणीप्रमाणे मा. स्थापत्य समिती ठराव क्र. ९२, दि. २०-५-१६ चे शिफारसीने आलेल्या प्रकरणाचे अवलोकन केले.

सध्या तिबार पंपींगची आवश्यकता नसलेने सदरचे प्रकरण दप्तरी दाखल करणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष सर्वसाधारण सभेपुढे विषय क्र. ६९ ठ. क्र. ९३५ दि. १६/०९/२०१६ रोजी ठेवला खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

ऑक्टोंबर २००६ मध्ये संचारबंदीच्या काळात अतिक्रमण निष्कासीत करणेच्या मोहिमे अंतर्गत रस्त्याचे बाजूचे निष्कासीत करण्यात आलेले खोकेधारकांचे पुनर्वसन करणेसाठी जय भवानी प्रशालेच्या आवारात ६x८ या मोजमापाची खुली जागा पर्यायी जागा म्हणून भाडयाने देणे व भाडयाने दिलेल्या जागेस मुदतवाढ देणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव सदर प्रकरणी प्रस्तावात नमूद तक्ता क्र. १ मधील १ ते २० या लॅन्ड फी धारक यांचेकडून आजतागायत पर्यंतचे भाडे स्विकारुन पुढील ३ वर्षाकरिता मुदतवाढ देऊन पुढील मुदतीचे भाडे सन २०१५ च्या चालू शिघ्रसिध्दगणकानुसार आकारणेस व प्रस्तावात नमूद तक्ता क्र. २ मधील २ ते ७ मधील मौला अल्लाबक्ष शेख, समीर अन्सर तांबोळी, हमीदाबी तांबोळी, पांडुरंग संभाजी झांबरे यांना त्यांचे नावासमोर तक्त्यामध्ये नमूद केलेप्रमाणे प्लॉट दि. १९-२-२०११ पासून भाडयाने दिलेला आहे असे गृहीत धरुन चालू सन २०१५ चे शासकीय शिघ्रसिध्दगणकानुसार आजतागायत पर्यंत होणारे भाडे आकारुन त्यांना पुढील ३ वर्षाकरिता जागा भाडयाने देणेस व सदरहू ठिकाणी प्लॉट क्र. ६ ची जागा श्री. जगदीश नथुलाल शर्मा यांना सदरचा प्लॉट त्यांचे नावे होऊन मिळणेबाबत कोर्टाचा वारस दाखला हजर करणेबाबत कळविणेस, सदरचा प्लॉटची जागा त्यांचेच ताब्यात असल्याने त्यांचेकडून सन २०१५ च्या शासकीय शिघ्रसिध्दगणकानुसार ॲक्यपन्सी प्राईज घेणेस व सदरचा प्लॉट त्यांना दि. १९-२-२०११ पासून भाडयाने दिलेला आहे असे गृहीत धरुन चालू सन २०१५ चे शासकीय शिघ्रसिध्दगणकानुसार भाडे आकारुन त्यांना पुढील ३ वर्षाकरिता जागा भाडयाने देणे व प्रस्तावात नमूद तक्ता क्र. २ मधील श्री. बबन कृष्णात होमकर यांनी त्यावेळी २५००/- इतकी ॲक्युपन्सी प्राईज भरली असल्याने त्यांना सदर ठिकाणी ६x८ = ४८ चौ. फूट या मापाची जागा प्रथम ३ वर्षाकरिता भाडयाने देऊन सन २०१५ च्या शासकीय शिघ्रसिध्दगणकानुसार भाडे आकारणी करणे व श्री. जागीर बशीर अहमद शेख यांचे नावे मंजूर करण्यात आलेली जागा राखीव ठेऊन ज्यावेळी ते जागा मिळणेबाबत अर्ज करतील त्यावेळी सक्षम मान्यतेने सदर ठिकाणी ६x८ = ४८ चौ. फूट इतकी जागा भाडयाने देणेस व तसेच नव्याने बांधण्यात आलेले १०x१० = १०० चौ. फूट या मापाचे गाळा ताब्यात घेणे बाबत मा. सर्वसाधारण सभेकडे पाठविणेस मा. आयुक्त यांचे दि. २-५-१६ चे टिपणी प्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका.

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/चालू/विशेष
सर्वसाधारण सभेपुढे विषय क्र.अ. ६० ठ. क्र. १३६
दि. १६/०५/१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

प्रभाग क्र. ५० मध्ये अभियंता नगर येथे पिण्याचे पाण्याची पाईप लाईन घालणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव विषयांकित कामाचे सविस्तर पूर्वगणनपत्रक क्र. २०१६-१७ र.रु. ३,४९,७८२/- इतकेचे तयार केले असून याकामी येणारा खर्च सन २०१६-१७ चे भांडवली कामे करणे/मा. शासन अनुदान या बजेट सदरातून र.रु. ३.५० लाख इतकी तरतूद उपलब्ध होवून मिळणेकामी मा. आयुक्त यांचे दिनांक १२-५-१६ चे टिपणी प्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

सदरकामी सन २०१६-१७ चे भांडवली कामाच्या खर्चाच्या तक्त्यामधील पाण्याच्या टाक्या बांधणे व पाईप लाईन घालणे/उजनी पाकणी सोरेगांव भवानी पेठ येथे प्लो मिटर बसविणे या बजेट सदरातून तरतूद करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या सहकार/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज ७८७ ठ. क्र. ९३७
दि. १६/०८/२०१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

श्री. बसय्या शिवय्या हिरेमठ राहणार ६४ गरिबी हटाव झोपडपट्टी क्र. १ मारुती मंदिर जवळ विजापूर नाका पाठीमागे सोलापूर यांना ब्रेन टयुमर झाल्याने पुणे येथील रक्षक मल्टीस्पेशालिटी हॉस्पीटल येथे उपचार घेतला आहे. औषध उपचारासाठी १,७५,०००/- इतका खर्च झालेला आहे. श्री. बसय्या शिवय्या हिरेमठ रा. ६४ गरिबी हटाव झोपडपट्टी क्र. १ मारुती मंदिर जवळ विजापूर नाका पाठीमागे सोलापूर घरची परिस्थिती अत्यंत गरिबीची व हलाकीची असल्याने सोलापूर महानगरपालिकेतर्फे जास्तीत जास्त आर्थिक मदत देण्यास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. महापौर यांना अधिकार देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका.

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/सासाधारण/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. ७८ ठ. क्र. १३८ दि. १६/०९/२०१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



श्रीमती कलावती देविदास जैनजांगडे, राह. पडगाजी नगर, अक्कलकोट रोड सोलापूर यांचे रहाते घरास आज दि. २०-५-२०१६ रोजी सकाळी ११.०० वाजता शॉर्ट सर्किटने आग लागून मोठया प्रमाणावर नुकसान झाले आहे. संसारोपयोगी सर्व साहित्य आगीत जळून खाक झाले असल्याने व त्या विधवा, मागासवर्गीय महिला असून, त्यांचे पुन्हा संसार चालविण्याकरिता आर्थिक मदतीची अत्यंत आवश्यकता असल्याने, महानगरपालिकेचे वतीने जास्तीत जास्त आर्थिक मदत देण्यास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. महापौर यांना अधिकार देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/चालू/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. ७९ ठ. क्र. १३९
दि. १६/९/१६ रोजी ठेवला असलेला प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सोलापूर शहरातील मध्यवर्ती ठिकाणी असलेले राणी लक्ष्मीबाई मंडई या नावाने ओळखले जाणारे प्रसिध्द भाजी मार्केट आहे. सदर ठिकाणी भाजी विक्रेते व फळफळावळ विक्रेते आपले व्यवसाय करुन उपजिविका भागवितात. याठिकाणी असलेला मार्केट हा जुना आहे. पूर्वी कृषी उत्पन्न बाजार समितीचे लिलावही या मार्केटमध्ये होत असत. राणी लक्ष्मीबाई या एकोणीसाव्या शतकातील झाशीच्या राज्याच्या राणी होत्या हिंदुस्थानात १८५७ साली झालेल्या ईस्ट इंडिया कंपनीविरुध्द झालेल्या स्वातंत्र्य उठावातील एक अग्रणी सेनानी होत्या. त्यांच्या शौर्याने त्यांना क्रांतीकारकांची स्फूर्ती देवता म्हणून अढळ स्थान प्राप्त झाले आहे.

अशा या कर्तबगार महिला सेनानींच्या स्मृतीप्रित्यर्थ या ठिकाणी असलेल्या मार्केटला त्यांचे नांव देऊन एकप्रकारे गौरव केला आहे. परंतू तेथील काही समाजकंटकांनी याठिकाणी असलेल्या राणी लक्ष्मीबाई मार्केट या फलकावरील लक्ष्मी हे नांव हातोडा सारख्या अवजड हत्याराने फोडून नांव पुसून टाकले आहे. ही बाब अत्यंत लांच्छनास्पद व इतिहासाला काळीमा फासणारी व निंदनीय अशी आहे. तरी या मार्केटचे नामकरण केलेले नामफलक काढून त्याठिकाणी ग्रेनाईटमध्ये **राणी लक्ष्मीबाई मार्केट** अशा नावाचे नामफलक लावणेसाठी योग्य ती कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरची कार्यवाही मा. आयुक्त यांनी त्वरीत करावी.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका.

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/चालू/खास
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. नं. ८० ठ. क्र. १४०
दि. १६/९/१६ रोजी ठेवता खालील सो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



टी.पी. १, फा. प्लॉ. नं. ३४/A-१ न्यू पाच्छा पेठ ही लेआऊटमधील खुली जागा महानगरपालिकेने दै. केसरीमध्ये जाहिर प्रसिध्दीकरण देऊन सार्वजनिक वापरासाठी खुली करण्याच्या इरादयाने सूचना व हरकती मागविलेल्या होत्या. या कालावधीत कोणतीही सूचना व हरकती न आल्याने ती जागा मनपाच्या ताब्यात घेऊन सार्वजनिक म्हणून जाहिर करण्यात आलेली आहे. तरी सदर जागा ही पूर्णपणे मनपा मालकीची असल्याने या जागेवर डी. पी. प्लॅन नुसार बागेसाठी आरक्षित असल्याने सदर जागेस **गीता नगर शिवमार्कंडेय उद्यान** असे नामकरण करणेस, येणारे खर्चास त्याप्रमाणे नामफलक लावणेस मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. नामाभिदान कमिटीने निर्णयास्तव पाठविण्यांत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/~~मासिक~~/~~विशेष~~
सर्वसाधारण सभेपुढे विषय क्र.अ. ८१ ठ. क्र. १८१
दि. १६/०९/२०१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला



जुना बोरामणी नाका येथील रहिवाशी श्रीमती महानंदा मुळे यांच्या घरात टेम्पो ट्रक घुसून झालेल्या अपघातामुळे त्यांचे घराची मोठया प्रमाणात पडझड झालेली आहे. सध्या त्या बेघर झालेल्या असून, ते निराधार झालेल्या आहेत. या अपघातात त्यांची मुलेही जखमी झालेली आहेत. त्या विधवा व निराधार असल्याने घराची छाया अपघाताने हरपली आहे. सध्या त्यांची मुले शिक्षण घेत असून, त्यांच्या भविष्यातील जिवनाविषयी व शैक्षणिक भवितव्याच्यादृष्टीने त्या अत्यंत हतबल झालेल्या आहेत. सध्या त्यांना पहिल्यांदा पडलेल्या घराची डागडुजी करुन घर उभे करावयाचे असल्याने त्यांनी आर्थिक मदतीची याचना केलेली आहे. तरी माणूसकीच्यादृष्टीने त्यांना महानगरपालिकेतर्फे जास्तीत जास्त आर्थिक मदत देणेस मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. महापौर यांना अधिकार देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका.